Vol 4 Issue 12 Jan 2015

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 3.1560(UIF)
Volume-4 | Issue-12 | Jan-2015
Available online at www.isrj.org

# 'विधानसभा निवडणूक 2014 – महाराष्ट्राच्या राजकारणाची वाटचाल'

*दिनकर एस. कळंबे[1] , सोनाली त्र्यंबकराव पडूळ[2]*

[1]राज्यशास्त्र विभाग प्रमुख , मोरेश्वर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, भोकरदन, ता. भोकरदन जि. जालना.
[2]एम.ए., राज्यशास्त्र विभाग,मोरेश्वर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, भोकरदन, ता. भोकरदन जि. जालना.

***सांराश :-***2014 ची महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक अनेक अर्थांनी महाराष्ट्राच्या राजकारणाची नवीन वाटचाल करणारी आणि म्हणूनच तितकीच महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक ठरली आहे. या निवडणुकीने राज्याच्या राजकारणाला फार मोठी कलाटणी दिली आहे. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून महाराष्ट्रात 1995 चा अपवाद वगळता कॉग्रेस किंवा कॉग्रेस आघाडी सत्तेवर राहिली. 1995 साली शिवसेना–भारतीय जनता पक्षाची युती सत्तेवर आली. तिही कॉग्रेसमधल्या गटबाजीतून निवडून आलेल्या 45 अपक्ष आमदारांच्या जोरावर. त्या निवडणुकीत शिवसेनेला 73, तर भाजपाला 65 अशा एकूण 138 जागा मिळाल्या होत्या आणि त्यांना मिळालेल्या अपक्ष आमदारांच्या पाठिंब्यामुळेच युतीचे सरकार स्थापन होऊ शकले. त्यामुळे 1995 साली स्थापन झालेले सरकारही कॉग्रेसच्या प्रभावापासून मुक्त होते असे म्हणता येणार नाही.

## *प्रस्तावना :*

परंतु आता 2014 च्या निवडणुकीत महाराष्ट्राच्या राजकारणात प्रथमतःच कॉग्रेसला मोठा पराभव पत्करावा लागला आणि भाजप 122+1=123 जागा मिळवून सत्तेच्या जवळ जाऊन पोहोचला. वास्तविकतः 1990 पासून भारतातील अनेक राज्यांत, उत्तरप्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश भाजपने आपला प्रभाव निर्माण केला होता. परंतु महाराष्ट्रात मात्र भापजला कधीही मुसंडी मारता आली नाही. या वेळच्या निवडणुकीत मात्र भाजपने मुसंडी मारत 27.8 टक्के मते मिळविली. 2009 च्या विधानसभा निवडणुकीत पक्षाला 14 टक्के मते मिळाली होती. त्यावरुन 27.8 टक्के मते ही फार मोठी वाढ म्हणावी लागेल. म्हणूनच ही निवडणुक महाराष्ट्राच्या राजकारणाची नवीन वाटचाल करणारी आहे असे दिसते. या निवडणुकीची काही वैशिष्टये ठळकपणे सांगता येतील.
आघाडी राजकारणाला तडा

2014 ची निवडणूक ही अनेक अर्थांनी वेगळी, महाराष्ट्राच्या राजकारणात मैलाचा दगड ठरणारी निवडणूक म्हणावी लागेल. 1990 पासून महाराष्ट्राचे राजकारण तिरंगी आणि 1999 पासून चौरंगी होत आहे. त्यामुळे 1995 पासून म्हणजेच गेल्या वीस वर्षांत इथे आघाडीचेच सरकार स्थापन होत आलेले आहे. 1990 मध्ये 141 जागा मिळवून येथे कॉग्रेसचे एकपक्षीय सरकार सत्तेवर आले होते. परंतु त्यानंतर 1995 ला युतीचे, तर 1999 व 2004 व 2009 या सलग तीन निवडणुकानंतर आघाडीचे सरकार सत्तेवर येत होते. या सर्व काळात कोणताही पक्ष स्वतंत्रपणे लढला नाही आणि कोणत्याही राजकीय पक्षाला 100 चा आकडाही गाठता आला नव्हता. परंतु भाजपने 2014 च्या विधानसभा निवडणुकीत 122 जागा मिळवून तो महाराष्ट्रातील सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला. तसेच आघाडीच्या राजकारणाला काही अशी आव्हानच दिल्याचे दिसते. अर्थात सत्तेच्या जवळ पण तितकेच दूर असे भाजपबाबत म्हणावे लागेल. कारण 145 चा जादूई आकडा त्यांना गाठता आला नाही.

## *आघाडीत बिघाडी आणि युतीत दूरी*

1990 नंतरच्या काळात महाराष्ट्राच्या राजकारणात आघाडीचे राजकारण स्थिरावले होते. भाजप व शिवसेनेने 1989 पासून हिंदुत्वाच्या आणि कॉग्रेस विरोधाच्या अजेंडयावर युती केली आणि गेली पंचवीस वर्षे ती टिकली. महानगरपालिका ते लोकसभा, अशा सर्व स्तरांवर या दोन्ही पक्षांनी निवडणुका लढवल्या व काही जिंकल्या. एवढेच नव्हे तर 2014 च्या लोकसभा निवडणुकीत या पक्षांनी, आरपीआय, स्वाभिमानी शेतकरी संघटना, शिवसंग्राम पक्ष, राष्ट्रीय समाज पक्ष यांच्याबरोबर आघाडी करुन सोशल इंजिनियरिंगची मोट हिंदुस्वाशी बांधून एक महाआघाडी केली आणि त्यात सर्वच पक्षांना फायदा झाला. विशेषतः भाजप व

शिवसेनेचे अनुक्रमे 23 व 18 उमेदवार निवडून आले. तर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेटटी निवडून आले. या आघाडीला 50.2 टक्के मते मिळाली. हा गौरवशाली विजय आपल्यामुळेच मिळाला असे भाजपा व शिवसेना या दोघांनाही वाटू लागले आणि त्यातून सत्तेसाठी नवी समीकरणे मांडली जावू लागली.

'शत प्रतिशत भाजप' या राष्ट्रीय अजेंडयाने प्रेरित झालेले भाजपाचे राज्यातील नेते शिवसेनेसोबत फारशी गांभीर्याने दखल घेईनासे झाले, तर महाराष्ट्राच्या निवडणुकीत शिवसेनेचाच भगवा फडकवायचा, या ध्येयाने उध्दव व आदित्य ठाकरे यांनी आखणी करायला सुरुवात केली. बाळासाहेब ठाकरेंचा राजकारणातून 2013 लाच अस्त झाला होता. त्यामुळे भाजपवर शिवसेनेचा तितकासा नैतिक व प्रेमाचा, हक्काचा दबाव नव्हता आणि पर्यायाने निवडणुकीच्या आधी दोन दिवस 25 वर्षाची ही युती फुटली. शिवसेनेने महायुतीतून बाहेर पडून स्वतंत्रपणे भगवा फडकविण्याचे ठरवले. भाजप शिवसेना यांचे महानाटय ज्या दिवशी घडत होते. त्याच दिवशी महाराष्ट्राच्या राजकारणाला आणखी एक नवीन वळण लागले. ते म्हणजे कॉंग्रेस आघाडी फुटण्याचे 1999 च्या निवडणुकीपूर्वी राष्ट्रवादी कॉंग्रेसची आघाडी करुन महाराष्ट्रात सरकार स्थापन केले होते, तर 2004 व 2009 च्या निवडणुकीत निवडणुकपूर्व आघाडी निर्माण करुन यश मिळवून सरकार स्थापन केले. पण 2014 च्या विधानसभा निवडणुकीत मात्र आघाडी टिकली नाही.

लोकसभेत झालेला पराभव पाहता कॉंग्रेस आघाडीला विधानसभेत यश मिळणार नाही, हे स्पष्टच होते. त्यामुळे जर पराभवच पत्करायचा, तर निदान आपली ताकद तरी पाहू असा समज दोनही पक्षांचा होता. आघाडीच्या सरकारमध्ये कॉंग्रेसची अवस्था 'धरल तर चावतय सोडल तर पळतय' अशी झाली होती. कारण राष्ट्रवादीबरोबर आघाडी गरजेची होती पण त्याचबरोबर त्यांच्या भ्रष्टाचाराचे पापही कॉंग्रेसच्याच पदरात पडत होते. म्हणून कॉंग्रेसने स्वतंत्रपणे निवडणुका लढवायच्या ठरल्या. अशा तऱ्हेने निवडणुकीच्या तोंडावर एकीकडे भाजप शिवसेना ही युती तुटली, तर कॉंग्रेस–राष्ट्रवादी कॉंग्रेसची आघाडीही फुटली. परिणामी महाराष्ट्राच्या 1990 नंतरच्या इतिहासात प्रथमच प्रत्येक पक्ष स्वतंत्रपणे निवडणुकीत उतरला आणि चौरंगी लढती सुरु झाल्या. काही ठिकाणी पंचरंगी निवडणुकाही झाल्या.

### *निवडणूक निकालांचे विश्लेषण*

महाराष्ट्राची ही विधानसभा निवडणूक महाराष्ट्रातील नेत्यांपेक्षाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अधिक महत्त्वाची केली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अधिक महत्त्वाची केली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रात 27 प्रचारसभा घेतल्या. भाजपचे अध्यक्ष अमित शहा यांच्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रातील निवडणूक जिंकून देण्याची जबाबदारी सोपविली होती. शहा यांनी शिवसेनेला उंदिर म्हणून डिचवले, तर शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनीही अमित शहा यांना अफजल खान म्हणून हिणवले. उध्दव ठाकरे यांचा चहावाला देशाचा पंतप्रधान होऊ शकतो तर मी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री का होऊ शकत नाही असा भाजपला टोला लगावला.

शहरी मतदार लाभलेल्या मनसेला मुंबईत एकही जागेवर विजय मिळाला नाही. जुन्नरच्या एका जागेवर मनसेला विजय मिळाला. मनसेच्या सर्व विद्यमान आमदारांचा पराभव झाला. राष्ट्रवादी कॉंग्रेसलाही मुंबईत खाते उघडता आले नाही. मात्र एमआयएम या पक्षाने मुंबईत खाते उघडले.

प्रथमच सगळेच महत्त्वाचे पक्ष स्वबळावर निवडणूक लढले. प्रचारसभा, पत्रके, वृत्तपत्रे आणि वाहिन्यांवरुन लोकांना आवाहन करण्यात आले. यावेळी शिवसेना आणि भाजपची गेल्या पंचविस वर्षापासून होत असलेली युती तुटली आणि त्यापाठोपाठ कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसची आघाडीही फुटली. त्यामुळे विधानसभा निवडणूक तिरंगीची पंचरंगी झाली. प्रत्येक पक्षाने या निवडणुकीत बहुमत मिळविण्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावले होते. निवडणुकीपूर्वी भाजपने कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेसमधील 65 जणांना आपल्या जाळयात ओढले. स्वतंत्र विदर्भाच्या मुद्याबद्दल भाजपने घेतलेली धरसोडीची भूमिका हे या निवडणुकीचे वैशिष्टय म्हणावे लागेल. भाजपचे प्रदेशाध्यक्ष देवेंद्र फडणवीस, पक्षाचे दुसरे जेष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांनी स्वतंत्र विदर्भाचे ठाम समर्थन केले होते. मात्र भाजपच्या दृष्टीपत्र या जाहीरनाम्यात स्वतंत्र विदर्भाच्या मुद्याला पूर्णपणे बदल देण्यात आली.

### *महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकाल–2014.*

| पक्ष | 2014 | 2009 | जगा बदल |
|---|---|---|---|
| भाजप | 122 | 46 | +76 |
| शिवसेना | 63 | 45 | +18 |
| कॉंग्रेस | 42 | 82 | -40 |
| राष्ट्रवादी कॉंग्रेस | 41 | 62 | -21 |
| बहुजन विकास आघाडी | 3 | 2 | +1 |
| शेतकरी कामगार पक्ष | 3 | 4 | -1 |
| मनसे | 1 | 13 | -12 |
| एमआयएम | 2 | – | +2 |
| अन्य | 4 | 13 | -9 |
| अपक्ष | 7 | 25 | -18 |
| स्वाभिमानी शेतकरी संघटना | . | 1 | +1 |
| एकूण जागा | 288 | 288 | - |

2014 च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत 18 महिला विजयी
यंदाच्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील 18 महिला उमेदवारांना विजय मिळाला. यामध्ये भाजपच्या 10, कॉंग्रेसच्या 5, तर राष्ट्रवादीच्या 3 महिलांचा समावेश आहे. विधानासभेची निवडणूक लढवलेल्या 4119 उमेदवारांपैकी 276 महिला उमेदवार होते. कॉंग्रेस 27, भाजपा 21, राष्ट्रवादी 20, मनसे 15, शिवसेना 13 तर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष 1, बहुजन समाज पक्षाने 14 महिला उमेदवारांना उमेदवारी दिली व अपक्ष 109 महिला निवडणुकीच्या रिंगणात होत्या.

भाजपच्या महिला आमदार – पंकजा मुंडे(परळी), मेधा कुलकर्णी (कोथरुड), भारती लव्हेकर (वर्सोवा), मनीषा चौधरी (दहिसर), स्नेहलता कोल्हे (कोपरगाव), संगीता ठोंबरे (केज), मोनिका राजीव राजळे (शेवगाव), विद्या ठाकूर (गोरेगाव), माधुरी मिसाळ (पर्वती), मंदा म्हात्रे (बेलापूर).
कॉंग्रेसच्या महिला आमदार – वर्षा गायकवाड (धारावी), यशोमती ठाकूर (नेवासा), निर्मला गावीत (इगतपूरी), अमिता चव्हाण (भोकर), प्रणिती शिंदे (सोलापूर मध्य शहर).
राष्ट्रवादीच्या महिला उमेदवार – दीपिका चव्हाण (बागलाण), संध्यादिनी कुपेकर (चंदगड), ज्योती कलाणी (उल्हासनगर).
मनसेच्या 13 तर शिवसेनेच्या 10 महिला उमेदवारांपैकी एकही महिला विजयी झाली नाही.

### *प्रमुख राजकीय पक्षांना मिळालेल्या जागा व टक्केवारी*

| श्राजकीय पक्ष | 2009 आघाडी व युती असताना | | 2009 आघाडी व युती नसताना | |
|---|---|---|---|---|
| | जागा | मते टक्केवारी | जागा | मते टक्केवारी |
| कॉंग्रेस | 82 | 21 | 42 | 18 |
| राष्ट्रवादी पक्ष | 62 | 16.4 | 41 | 17.3 |
| भाजप | 46 | 14 | 122 | 27.8 |
| शिवसेना | 44 | 16.3 | 63 | 19.3 |
| म्नसे | 13 | 5.71 | 01 | 3.7 |

### *महाराष्ट्राच्या राजकारणात एम.आय.एम.चा शिरकाव*

महाराष्ट्रातील मुस्लीम समाज नेहमीच कॉंग्रेसच्या मागे राहिला आहे. एम.आय.एम. (मजलिस–ए–इत्तेहादूल–मुसलमीन) या पक्षाला 90 वर्षांचा इतिहास आहे. एम.आय.एम.ची स्थापना 1927 मध्ये हैद्राबाद संस्थानात निझाम नवास मीर उस्मान अली यांनी केली. हा पक्ष निझामधार्जिणा होता आणि त्यांचा हैद्राबादच्या भारतातील विलीनीकरणास विरोध करणाऱ्या रझाकारांशीही संबंध होता. हैद्राबाद मुक्तीनंतर एम.आय.एम.वर बंदी घालण्यात आली होती. रझाकारांचा नेता कासिम रिझवी 1957 पर्यंत तुरुंगात होता. पाकिस्तानमध्ये जाण्याच्या अटीवर त्याची मुक्तता करण्यात आली. त्याने एम.आय.एम.ची जबाबदारी अब्दुल वाहिद ओवेसी यांच्याकडे दिली.

2014 च्या विधानसभा निवडणुकीत पक्षाने मोजकेच उमेदवार उभे केले. औरंगाबाद (मध्य) आणि भायखळा (मुंबई) येथून पक्षाचे दोन उमेदवार निवडून आले आहेत. कट्टरपंथी एम.आय.एम.चा महाराष्ट्राच्या राजकारणातील प्रवेश निश्चितच स्वागतार्ह नाही. त्याच्यायोगे धार्मिक समूहांचे ध्रुवीकरण होणे, हे महाराष्ट्राच्या धर्मनिरपेक्ष परंपरेला आव्हान देणारे आहे.

### *निष्कर्ष*

महाराष्ट्राची विधानसभा निवडणूक 2014 ही सर्व राजकीय पक्षांनी स्वतंत्रपणे लढले पण कोत्याही एका राजकीय पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नाही. भाजप निवडणुकीत सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयाला आला पण शेवटी शिवसेनेसोबत युती करणे अपरिहार्य ठरले व भाजप–शिवसेना अंतिम टप्प्यात एकत्र आले व सरकारला स्थिरता मिळाली. सरकारच्या स्थैर्यासाठी युती आवश्यकच झाली.

### *संदर्भ*

1.सुहास पळशीकर – महाराष्ट्र असेब्ली इलेक्शन, फेअरवेल टू मराठा पॉलिटिक्स, ई.पी.डब्ल्यू. खंड 49, अंक 43, 44, 1 नोव्हेंबर 2014.
2.स्टॅटिस्टीकल रिपोर्ट ऑन जनरल इलेक्शन, लेजिस्लेटिव्ह असेंब्ली ऑफ महाराष्ट्र 1995, 1999, 2004, 2009 इलेक्शन कमिशन ऑफ इंडिया, न्यू दिल्ली.
3.स्टडी सर्कलद्वारा प्रकाशित – स्पर्धा परीक्षा – नोकरी संदर्भ, डॉ. आनंद पाटील, नोव्हेंबर 2014.
4.चाणक्य मंडळ परिवार – स्पर्धा परीक्षा तयारी, डॉ. अविनाश धर्माधिकारी, डिसेंबर 2014.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org